महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
(CIN No. U40109MH2005SGC153646)
अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय
अतिउच्चदाब संवसु मंडल, पुणे
प्रशासकीय इमारत, कक्ष क्र.४०४, ३ रा मजला, रास्तापेठ, पुणे-४११ ०११
☎ क्र.०२०-२६०६०२८६ (वै), २६१३१७२९ (का) फॅक्स क्र.०२०-२६१३२३४२
Email Id : se6100@mahatransco.in

जा.क्र.अअ/अउदा/संवसु/पुणे/ № 774 दिनांकः 28 MAR 2018

विषयः- सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंता यांना लॉटरी पध्दतीने कामे वाटप करण्यासंबंधी योजने अंतर्गत नोंदणी करणे विषयी.

संदर्भः- १.आय, ई व एल डिपार्टमेंट, जीओएम जीआर नं.एमआयएससी-२०१५/सीआर-६३/एनर्जी-५ दिनांक २६.०३.२०१५.
२.एमएसईटीसीएल/सीओ/ट्रान्स ओॲण्डएम/एसई-२/ईई-८/१२८८३ दिनांक ०५.१२.२०१६.

सुशिक्षित बेराजगार विद्युत अभियंता यांना विनास्पर्धा थेट लॉटरी पद्धतीने कामे वाटपाची योजना महाराष्ट्र शासनाच्या निर्णय संदर्भ क्र.१ अन्वये अधीन राहून महापारेषण कंपनीने संदर्भ क्र. २ अन्वये लागू केली आहे.

सदर परिपत्रकाला अनुसरुन अधीक्षक अभियंता, अउदा संवसु मंडल, म.रा.वि.पारेषण कं.मर्या., पुणे या कार्यालयात सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंता यांची नोंदणी सुरु आहे.

सदर विद्युत अभियंता हा सुशिक्षित बेरोजगार असावा व तो कोणत्याही प्रकारचे शिक्षण घेत नसावा. तसेच सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंत्याने दिलेली माहिती खोटी आढळून आल्यास त्याला महापारेषण कंपनीने प्रदान केलेला नोंदणीकृत परवाना रद्द करयात येईल, तसेच महापारेषण कंपनीने या योजनेअंतर्गत काढलेल्या पुढील कोणत्याही लॉटरी प्रक्रीयेमध्ये सहभागी होता येणार नाही व सदर अभियंत्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

अधीक्षक अभियंता, अउदा संवसु मंडल, पुणे या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रहिवासी असलेल्या सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंता यांनी सदर योजने अंतर्गत नाव नोंदणी करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव या कार्यालयास सादर करावा.

(अनिल कोलप)
अधीक्षक अभियंता,
अउदा संवसु मंडल, पुणे.

अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय
म.रा.वि.पारेषण कं.मर्या.,
अतिउच्चदाब संवसु मंडल, पुणे
प्रशासकीय इमारत, कक्ष क्र.४०४, ३ रा मजला, रास्तापेठ, पुणे-४११ ०११
Email Id : se6100@mahatransco.in